# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद

**डॉ. देसाई अजित यल्लाप्पा** राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध तालुका खटाव जिल्हा सातारा

---

महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन विविध अंगी पैलूंनी युक्त असे आहे. कोणत्याही महापुरुषांच्या बाबतीत जसे शाश्वत व तत्कालीन असे विचारांचे दोन भाग करावे लागतात तसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीतही करता येणे शक्य आहे. परंतु या प्रदीर्घ संघर्षाच्या कालखंडात त्यांच्या सर्व विचारांचा संदर्भ राहिला आहे. देशाची एकात्मकता, देश, राष्ट्र, संस्कृती, धर्म या सर्वांच्या बाबत त्यांनी केलेले मूलगामी चिंतन आपल्याला सदैव मार्गदर्शक राहतील. राष्ट्रहिताचे भान ठेवल्याचे पदोपदी जाणवते. या सर्व चिंतनाचा मूलाधार या मातीत, या संस्कृतीत, धर्मात, त्यांनी शोधलेला आपणास आढळतो. राष्ट्रहितासाठी क्वचितप्रसंगी त्यांनी आपल्या विचारालाही मुरड घातल्याचे आढळते. त्यांचे राष्ट्रचितन हा आपल्या देशाचा एक अमोल ठेवा आहे. समाजाच्या एकात्मतेचा आणि जडणघडणीचा विचार रुजवावयाचा असेल तर अंत:करण पूर्वक स्वीकार सर्वांनी करावयास हवा, असा महत्वपूर्ण संदेश त्यांच्या जीवन चरित्रातून आपल्याला मिळतो. आधुनिक राष्ट्रवादाचे महान शिल्पकार म्हणून इतिहासात अजरामर होऊन राहणार आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रवादाचा विचार अनेक पैलू मधून मांडला आहे.

शोधन पद्धत

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य यासंबंधी चर्चा करत असताना प्रस्तुत शोधनिबंधासाठी वैचारिक मंथन आवश्यक आहे व ते करण्यासाठी विविध संशोधन पद्धतीचा वापर केला गेला आहे यामध्ये प्रामुख्याने समाजशास्त्रीय पद्धतीचा वापर केला आहे त्याचबरोबर समाजातील वास्तव व त्यांचे विचार यांचा अभ्यास करत असताना तौलनिक पद्धतीचा सुद्धा वापर केला आहे

राष्ट्राची ओळख ही समाजाच्या आचारा विचारानेच जगाला होत असते. एकात्म राष्ट्र हे एकरस आणि समता युक्त समाजाचीच प्रणिती असू शकते, हा विचार डॉ. बाबासाहेबांनी मांडला. जन्माधिष्ठित उच्च नीचतेने पोखरलेला समाज एकात्म राष्ट्राची उभारणी करू शकणार नाही, असे मत त्यांनी प्रतिपादन केले आहे. सुदृढ आणि बलशाली राष्ट्राचे निर्मिती ही त्या राष्ट्राच्या परस्पर संबंधावर अवलंबून असते या अर्थाने हे सर्व घटक एका कुटुंबातील घटकासारखे व बंधुत्वाचे नाते प्रस्थापित करून एकरस झालेले असावेत. आपण सारे जण एकाच ईश्वराची लेकरे असून त्यात भेदाभेद निर्माण करणाऱ्या दलालांना दूर सारण्याचा विचार बाबासाहेबांनी मांडला होता. स्वातंत्र्य, समता, आणि बंधुभाव या तत्व प्रणालीवर बाबासाहेबांचे अपार प्रेम होते, पण तरी देखील समाजाची बांधणी करावयाची असेल तर ती बंधूभावाने व्हावी तरच मानवतेचे नाते प्रस्थापित होऊ शकते असा विचार बाबासाहेबांनी मांडला आहे. बाबासाहेब म्हणतात "माझ्या तत्त्वज्ञानाची मुळे धर्मात आहेत, राज्यशास्त्रात नाहीत," त्यांच्या तत्त्वज्ञानात बंधूत्वाला फार उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य व समता फक्त बंधूभावानेच निर्माण होऊ शकते आणि या बंधुभावाचे दुसरे नाव आहे मानवता. मानवता, समता आणि समाजाबद्दल अपार करुणा, या चिरकाल टिकणाऱ्या संस्काराचा ठसा या गुरूंच्या तत्त्वज्ञानातून बाबासाहेबांच्या मनावर उमटलेला आहे. हिंदू लोकांना आपले राष्ट्र जगवायचे असेल तर बुद्ध धर्म स्वीकारला पाहिजे किंवा बहुजन समाजाला माणुसकीचे धडे देणारे ज्योतिबांचे तत्त्वज्ञान होते हा विचार काय, दोन्ही समाजाच्या घडणीबद्दलचे बाबासाहेबांचे मनोगत व्यक्त करणारे आहेत म्हणून त्यांना अभिप्रेत असलेली सामाजिक परिवर्तनाचे संकल्पना त्यांच्या राष्ट्राविषयी कल्पनेची जाणीव करून देते

डॉ. बाबासाहेब यांना अपेक्षीत असलेली सांस्कृतिक एकात्मता.

भारतीय समाज जातीच्या भेदाभेदांनी पार पोखरून निघाला आहे, याचे शल्य बाबासाहेबांनी सतत व्यक्त केले आहे. किंबहुना आपल्या आयुष्याची होळी केवळ जाती भेदाविरुद्ध संघर्ष करण्यासाठीच त्यांनी केली. या जातीच्या उतरंडीमुळे सांस्कृतिक एकता संपुष्टात आली व या भेदाभेदमुळेच हीच संस्कृती बनली, याचे दुःख बाबासाहेबांनी आपल्या विचारात मांडले आहे. जातीभेद विरहित व सांस्कृतिक एकतेवर अधिष्ठित समाज रचना हे राष्ट्रवादाचा आधार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. एकसंघ भारतीय समाज हा भक्कम राष्ट्र निर्मितीचा आधार आहे हे सांगताना बाबासाहेब म्हणतात "भारतीय लोकसमूह हा एकसंघ समाज आहे. भारतात आलेले वेगवेगळ्या वंशाचे लोक भिन्न भिन्न प्रदेशात स्थायिक झाल्यानंतर परस्परात विलीन झाले आणि त्यांच्यात सांस्कृतिक एकता निर्माण झाली, ही सांस्कृतिक एकताच एकात्मतेचे खरेखरे गमक आहे." या त्यांच्या विधानाने राष्ट्रवाद हा सांस्कृतिक एकात्मतेचे दुसरे नाव आहे हा सिद्धांत स्पष्ट होतो. भारतीय जाती ह्या एकसंघ समाजाचे कृत्रिमपणे लचके तोडून निर्माण केलेले निश्चित व स्थिर असे घटक होत. हे लचके तुटू न

देण्याचा सामाजिक समतेचा मार्ग बाबासाहेबांच्या विचारातून प्रकट झाला आहे. राष्ट्र उभारणी आणि सांस्कृतिक एकवाक्यता यांचे परस्परावलंबित्व या विचारातून स्पष्ट होते

भावनिक ऐक्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राष्ट्रवादाचे व्यवच्छेदक लक्षण, भावनिक ऐक्य हेच असले पाहिजे असे जाणवते. मनुष्यमात्राच्या मानसिक विकासाचा व बंधांचा विचार या जडणघडणीत प्राधान्याने आढळतो. जाती-पंथामुळे या भावनिक ऐक्याचा विनाश होतो व त्यातून राष्ट्र उभारणीत अडथळे उत्पन्न होतात, हे बाबासाहेबांनी सांगितलं आहे. कोणतेही परिवर्तन व क्रांती समानतेची ग्वाही देऊ शकत नसेल तर ते अर्थशून्य बनते. समाज हा गर्दीप्रमाणे राहू शकत नाही तर तो संघटित अवस्थेत राहावयास हवा, व त्यासाठी काही समान सूत्रांचा अवलंब करावा लागेल जसे की, श्रम विभागणी ही जरी समाजात आवश्यक असली तरी श्रमिकांचे विभाजन मात्र आवश्यक नाही, भौगोलिक परिस्थिती, समान चालीरीती, समान सन समारंभ, समान रूढी परंपरा, याच केवळ समाज बांधणीस पुरेशा नाहीत. समान वागणुकीमुळे मनुष्य दुसऱ्या समाजाचा घटक होतो असं नव्हे. एकसंघ समाजाची निर्मिती भावनिक ऐक्य, म्हणजेच अंत:करण पूर्वक स्वाभाविक एकरसता उत्पन्न झाल्याशिवाय होऊ शकणार नाही, त्या अर्थाने राष्ट्रवादाचा आधार भावनिक ऐक्य असू शकतो, हे बाबासाहेबांनी आपल्या ग्रंथामध्ये सांगितल आहे. एकात्मतेची भावना निर्माण होण्याकरिता समाजाच्या सर्व कार्यात त्यांनी भाग घेतला पाहिजे. तो इतरांशी समरस झाला पाहिजे, आणि इतरांच्या मनात निर्माण होणाऱ्या भावभावना त्याच्या मनात व अंत:करणात निर्माण झाल्या पाहिजेत. सामान्य कार्यात एक घटक म्हणून भाग घेताना त्या कार्याचे यश हे आपले यश व त्या कार्याचे अपयश हे आपले अपयश अशी भावना मनात जागृत होणे ही माणसांना समाज बंधनात एकत्र गोवण्यात अत्यंत महत्त्वाची बाब ठरते. जाती व्यवस्थेने हे भावनिक ऐक्य नष्ट केल्याची खंत व्यक्त करताना समाजाची बांधणी मानसिक बंधामुळे होईल या भावनेचा उद्धोष बाबासाहेबांनी केला आहे. सामाजिक विषमता नष्ट करण्याचा चिरस्थळी मार्ग हा मनाच्या निकोपेतूनच साकार होत असतो यासाठी समान संधी सुद्धा गरजेची असते.

समान संधी

अशा समतेवर समाजाची निर्मिती करण्याचे कठीण कर्म बाबासाहेबांनी केले. समाजात उत्पन्न झालेला जीवनकलह हा राष्ट उभारणीच्या कामातील प्रमुख अडसर ठरत आलेला आहे. चातुरवर्ण व्यवस्थेचा बळी ठरलेला अस्पृश्य समाज किंवा उत्पादनाच्या साधनाचा धनी न झालेला दरिद्री समाज, सामाजिक विषमतेचाच परिपाक आहे. समाज पुरुषाचे अविभाज्य अंग असलेले समान महत्त्वाचे घटक जर संधी पासून वंचित राहू लागले तर समाज ऐक्य आणि उन्नती साध्य करू शकणार नाही, याचे अनुभूतीवर आधारित पोटतीडकीचे विवरण बाबासाहेबांनी केले आहे. समान संधीचा अभाव हे सामाजिक व आर्थिक रोगांची मूळ कारण आहे. समाजाच्या मानसिकतेमुळे व परंपरागत चालत आलेल्या कृतीमुळे, हा समान संधीच्या आभासाचा प्रश्न उद्भवला आहे. नोकरी, धंदे, व्यवसाय, अर्थप्राप्ती या सर्व बाबतीत अस्पृश्य समाजावर झालेला वर्षानुवर्षाचा अन्याय बाबासाहेबांनी आपल्या चिंतनात मांडला आहे. त्यातूनच आरक्षण किंवा राखीव जागेचा प्रस्ताव त्यांनी पुढे आणला व अस्पृश्य समाजाला समान संधी देणारे साधन म्हणून त्याचा विचार होऊ लागला. यामध्ये त्यांनी समाजाच्या प्रगतीसाठी समान संधीचे सूत्र सर्वात समोर ठेवले. परस्पर संबंधांचा विकास तर झालाच पाहिजे, पण त्याचबरोबर पारिवारिक नात्याच्या दृष्टिकोनातून समान संधीचे वातावरण उत्पन्न करण्याची जबाबदारी ही स्वीकारली पाहिजे. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या राष्ट्र निर्मितीच्या कार्यात समान संधीच्या सूत्रांचा अवलंब म्हणूनच महत्त्वाचा ठरतो

भेदांचे उच्चाटन, राष्ट्रहितांचे कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू समाजाच्या दोषांवर आघात केले आहेत. हिंदू समाजाची सुधारणा घडवून आणण्यासाठी या आघातांचा उपयोग झाला. या दोषांचे निराकरण व्हावे व दोष विरहित हिंदू समाज उत्पन्न व्हावा असाच हेतू त्यातून स्पष्ट होतो. राष्ट्रहितास व हिंदू समाज समर्थ व्हावा असे कळकळीचे आवाहन बाबासाहेबांनी केले महाडच्या प्रकरणामध्ये राष्ट्रहिताचे बाजू मांडताना विषमतेने ग्रस्त असलेल्या व अन्याय वर्तनाने भरलेल्या हिंदू समाजावर कोरडे ओढले, पण त्या सगळ्या विश्लेषणाचा हेतू भेदांचे उच्चाटन व्हावे व राष्ट्रहित साधावे असाच आहे 1927 च्या प्रसिद्ध चवदार तळे संघर्षाच्या प्रसंगी बाबासाहेब आपल्या आवाहनात म्हणतात "हिंदू समाज समर्थ करावयाचा असेल तर चातुर्यवर्ण व असमानता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एक वर्णत्व व समता या दोन तत्त्वांच्या पायावर केली पाहिजे." राष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेतील कायद्याचे स्थान हे बाबासाहेबांनी विशद केले आहे. हिंदू कोड बिलासाठी त्यांनी केलेले प्रयास हे समाजात समान कायद्याचे व समतेच्या व्यवहाराचेच प्रयास होत. सर्व देशासाठी एक सिविल कोड असावे हे

बाबासाहेबांचे प्रतिपादन म्हणजे, जाती वंश पंथ भेद विरहित समाजाचेच स्वप्न आहे. सर्व समाजाच्या आर्थिक प्रगतीचा आलेख समानतेचा निदर्शक असावा असे त्यांचे म्हणणे त्यांनी आर्थिक विचारात मांडले आहे. सामाजिक समतेचीच प्रेरणा आर्थिक प्रगतीच्या प्रतिपादना मागे आहे त्यामुळे बाबासाहेबांची राष्ट्रकल्पना ही भावनिक ऐक्या बरोबरच भौतिक प्रगतीतून समानता साधण्याच्या प्रयत्नांची साक्ष आहे.

प्रखर राष्ट्रवादी विचारांच्या बाबासाहेबांनी हिंदू धर्मातील वैगुण्यावर नेमके बोट ठेवले त्यातील भेदाभेदांचे भक्ष बनलेल्या आपल्या समाज बांधवांना धर्मांतराची हाकही त्यांनी दिली गौतम बुद्धाच्या समाज व्याप्ती तत्त्वज्ञानाचा बाबासाहेबांनी अंगीकार केला परंतु हे धर्मांतर हे राष्ट्रविघातक प्रवृत्तींना पोषक करणारे झाले नाही ते केवळ बाबासाहेबांच्या प्रकर राष्ट्रवादी स्वाभावामुळेच बौद्ध धर्मातील समता आणि करण्याच्या तत्त्वज्ञानाचे बाबासाहेब एक प्रकारचे अग्रदूत ठरले. शिक्षणाच्या मार्गाने समाजाची प्रगती करण्याचे वृत्त त्यांनी आचरले. शिका संघटित व्हा संघर्ष करा, या त्रिसूत्रीने दलित समाजात आत्मसन्मानाची ज्योत प्रजल्वित झाली. मजुरांच्या लढ्याने दलित समाजाला आपले हक्क समजले व शक्तीचे प्रचिती ही आली. गौतम बुद्धाच्या या थोर उपासकाने साम्यवादी विचारातील हिंसा, जबरदस्ती, हुकूमशाही या दोषांचा उच्चार केला. साम्यवादी तत्त्वज्ञानातील हुकूमशाहीतून न्याय व करुणा उत्पन्न होणार नाही म्हणून गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान अंगी करण्याचा स्पष्ट आग्रह धरला. असहिष्णुने ग्रासलेल्या मुसलमान समाजाच्या अ राष्ट्रीयतेचा नि:संधीग्ध शब्दात बाबासाहेबांनी निर्देश केला. राष्ट्र उभारणी लोकशाही तत्त्वावरच व्हावी असे राज्यघटनेत आग्रहाने मांडले. भाषावार प्रांतरचनेतून समस्या उभ्या राहतील व त्यातून राष्ट्रीय एकात्मतेस आव्हान उत्पन्न होईल हे ओळखून राष्ट्रभाषेचा आग्रह धरला. याच संदर्भात भाषावार राज्य रचना या आपल्या लेखात त्यांनी भाषा संस्कृतीचे साधन आहे व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी एक भाषा असणे आवश्यक आहे, हे ठोसपणे मांडले. समाजाची धारणा करतो तो धर्म, या व्याख्येचा स्वीकार करून ही धारणा समतेवर आधारित असावी अशी विचारसरणी जगभर पसरवली. राष्ट्रवादा बरोबर विश्वबंधुत्वाच्या कल्पनेचाही अंगीकार करून त्यांनी राष्ट्रवादीची व्याप्ती वाढवली. "भारतीय राज्यघटनेची मिमांसा" या लेखात प्रकर राष्ट्रवादाचा त्यांनी पुनरुचार केला व त्यासाठी जी आदर्श रचना मांडली ती समरसतेच्या तत्त्वावर आधारित अशी. हजारो जातीमध्ये विभागलेले लोक राष्ट्र कसे बनणार सामाजिक व मानसशास्त्रीय अर्थाने आपण अद्याप राष्ट्र बनलेलो नाही याची जेवढ्या लवकर आपण जाणीव ठेवू तेवढे चांगले, कारण त्यानंतरच आपण राष्ट्र बनवण्याची किती गरज आहे याची जाणीव होईल

डॉक्टर आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा अशा विविध पैलूंमधून प्रकट होतो सामाजिक समरसतेच्या प्रांगणातून व विषमतेची विषवल्ली दूर करण्याच्या प्रकर आव्हानाच्या मार्गाने जाणारा बाबासाहेबांचा राष्ट्रवाद नवभारताच्या निर्मितीसाठी सतत प्रेरणादायी ठरणार आहे

संदर्भ 1. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, विचार आणि कार्य - परिसंवाद, संयोजक, पुणे विद्यापीठ विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण मंडळ

2. डॉक्टर आंबेडकर आणि राष्ट्रवाद- प्रा. अनिरुद्ध देशपांडे